CNR No. MHRG120000532021

नियमीत दिवाणी दावा क्र. ५/२०२१
रामचंद्र वि. आनंदी वगैरे

**निशाणी क्र.२० कडील आदेश**

प्रस्तुतचा अर्ज वादीने मयत प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेण्यासाठी दाखल केला आहे. अर्जातील थोडक्यात कथन असे आहे की, प्रतिवादी क्र. १ आनंदी दत्तात्रेय पाटील यांचा मृत्यू दिनांक २१/०६/२०२१ रोजी झाला. त्यांच्या पश्चात त्यांना पुष्पा गणेश नाकती, निर्मला काशिनाथ वाघरे, प्रदिप दत्तात्रेय पाटील, गणेश दत्तात्रेय पाटील आणि प्रतिवादी क्र. २ हे वारस आहे. या कारणास्तव यांनी प्रस्तूतचा अर्ज मंजूर करण्याची मागणी केली आहे. प्रतिवादी क्र. २ यांनी आपले म्हणणे दाखल करुन योग्य तो आदेश करण्याची मागणी केली आहे. वादी व प्रतिवादी यांच्या विद्वान विधीज्ञांचा युक्तीवाद ऐकला. अर्ज आणि अर्जासोबत सादर करण्यात आलेल्या प्रतिज्ञालेखावरुन प्रतिवादी क्र. १ यांचा मृत्यू दिनांक २१/०६/२०२१ रोजी झाला असल्याचे स्पष्ट आहे. प्रस्तूतचा अर्ज प्रतिवादी क्र. १ यांच्या मृत्यूनंतर ९० दिवसांच्या आत दाखल करण्यात आला असल्यामुळे प्रतिवादी क्र. १ यांचे वारस अभिलेखावर घेणे आवश्यक आहे या मतास मी पोहोचलो आहे. करिता मी खालील आदेश पारित करतो -

**आदेश**

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. वादीने प्रस्तूत आदेशापासून १४ दिवसाच्या आत वाद पत्रात दुरुस्ती करुन मयत प्रतिवादी क्र. १ यांच्या वारसांना प्रतिवादी म्हणून सामील करावे आणि दुरुस्ती वाद पत्र सादर करावे.

(खुल्या न्यायालयात जाहिर)

(सं. गं. सरोदे)
दिवाणी न्यायाधीश कनिष्ठ स्तर,
मुरूड

दिनांक : ०४/१०/२०२१